**क्रमांक ५४३४ /ई-१**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

विधान भवन, मुंबई

दिनांक : १० मार्च, २०२३

**: परिपत्रक :**

**विषय:** **महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे सुधारित विवरणपत्र..**

**संदर्भ:** **या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक २६७७/ई-१, दिनांक १ फेब्रुवारी, २०२३**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचा कालावधी सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते शनिवार, दिनांक दिनांक २५ मार्च, २०२३ असा ठरविण्यात आला असून सोमवार, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी सभागृहाची बैठक घेऊ नये असे निश्चित करण्यात आले.

त्याअनुषंगाने या सचिवालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेली सोमवार, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजीची गट क्रमांक १ ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येईल. गट क्रमांक १ मध्ये (१) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री, (२) अन्न व औषध प्रशासन मंत्री, (३) उद्योग मंत्री, (४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, (५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री यांचा समावेश आहे.

**(राजेश तारवी)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रती :-**

(१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव

(२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव

(३) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव

(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठीअग्रेषित.